महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर ,कोल्हापूर -४१६ ००४.
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board, Rajendranagar,Kolhapur - 416 004.

Phone s: Chairman 2690829[O] 2656044[R]Secrtary 2691405[O]2324079[R].
PBX – 2696101,2696102,2696103 FAX :[0231] 2690758 E-Mail :divsec.kop@ gmail.com

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ ६२८४
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :-२५/०१/२०२१.

प्रति,
मुख्याध्यापक, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा,
जिल्हा- सातारा, सांगली व कोल्हापूर.

विषय:- सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.. ..

संदर्भ:- १) या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/५९५५ दिनांक २२/१२/२०२० रोजीचे परिपत्रक
२) या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/६१२० दिनांक ११/०१/२०२१ रोजीचे परिपत्रक

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि.२३/१२/२०२० ते दि.११/०१/२०२१ व संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये मुदतवाढीने दि.१२/०१/२०२१ ते दि.२५/०१/२०२१ या कालावधीत भरावयाची होती. सदर आवेदनपत्रे भरण्यास अंतिम मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा तसेच विलंब शुल्काच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची पध्दतीने आवेदनपत्रे Saral Database वरुन तसेच पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खाजगी विद्यार्थी (Private Repeater) तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे transfer of credit घेणारे विद्यार्थी), आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा. | माध्यमिक शाळांनी चलन download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा. | वितरण केंद्राकडे माध्यमिक शाळांनी बँकेत शुल्क भरेलल्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-List जमा करावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| अ) नियमित शुल्कासह | मंगळवार दि. २६/०१/२०२१ ते मंगळवार दि.०२/०२/२०२१ | बुधवार दि.२७/०१/२०२१ ते गुरुवार दि. १८/०२/२०२१ | सोमवार दिनांक २२/०२/२०२१ |
| ब) विलंब शुल्कासह | बुधवार दि. ०३/०२/२०२१ ते शनिवार दि.१३/०२/२०२१ | | |

अ) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांनी सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर त्यांना शाळा Login मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील नमूद केलेली जनरल रजिस्टरच्या माहितीनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी व त्याबाबत Pre-list वर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

ब) माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख सोमवार दि.२२/०२/२०२१ राहील.

इ.१०वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने नियमीत व विलंब शुल्कासह स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कोविड–१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषत: आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. शासन निर्णय क्र.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणक दि.१४/०८/२०१७ नुसार माध्यमिक शाळांनी नियमीत विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Database मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे. सदर Saral Data वरुनच नियमीत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत. परंतु ज्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data वरुन उपलब्ध नाही त्यांनी " All Application" च्या link मधून प्रचलीत पध्दतीने आवेदनपत्र भरावीत.

**३. पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Repeater), श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.**

४. कौशल्य सेतु अभियानाचे Transfer of Credit मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील online पध्दतीने आवेदनपत्र भरुन विषयासमोर Transfer of Credit ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलीत पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची हार्डकॉपी (Hard Copy) विभागीय मंडळात जमा करावी.

५. पुणे, औरंगाबाद, व कोल्हापूर विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलीत परीक्षा शुल्क बँक ऑफ इंडियाच्या चलनावरील नमूद मंडळाच्या **Virtual Account** मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

६. मुंबई, नागपूर व लातूर विभागीय मंडळाच्या कक्षेतील माध्यमिक शाळांनी प्रचलीत परीक्षा शुल्क एच.डी.एफ.सी. (HDFC Bank) बँकेच्या चलनावरील नमूद मंडळाच्या **Virtual Account** मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर करावयात.

७. अमरावती, नाशिक व कोकण विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलीत परीक्षा शुल्क ॲक्सिस (AXIS Bank) बँकेच्या चलनावरील नमूद मंडळाच्या **Virtual Account** मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर करावयात.

**८. आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारेच भरण्यात यावे. सर्व माध्यमिक शाळांनी गतवर्षीप्रमाणेच परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करुन चलनावरील नमूदप्रमाणे मंडळाच्या Virtual Account मध्ये NEFT/RTGS व्दारे वर्ग करावयाचे आहे. माध्यमिक शाळांनी NEFT/RTGS व्दारे वर्ग केलेली रक्कम त्यांच्या बॅंक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच Account Number व IFSC Code चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील.**

९. माध्यमिक शाळांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहित शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत. सदर बाब सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून दयावी. माध्यमिक शाळांनी उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण व अचूक शुल्क भरल्याची खातरजमा विभागीय मंडळ स्तरावर करुन त्याबाबतचा अहवाल

गणकयंत्र विभागाच्या नमून्यात राज्यमंडळ कार्यालयास सादर केल्यानंतर संबंधित माध्यमिक शाळांना विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येतील.

१०. यावर्षी नव्याने फॉर्म नं.१७ दवारे नोंदणी करणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची सन २०२१ मधील परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याचा कालावधी स्वतंत्रपणे निश्चित केला जाणार असल्याने उपरोक्त कालावधीत या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्यात येवू नयेत.

११. सन २०२१ मधील परीक्षेसाठी मार्च २०२० अथवा नोव्हेंबर-डिसेंबर २०२० मधील परीक्षेमध्ये एकाच वेळी सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच श्रेणीसुधार योजनेतंर्गत आवेदनपत्र भरुन परीक्षेस प्रविष्ठ होता येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी श्रेणीसुधार योजनेतंर्गत परीक्षेस प्रविष्ठ होणार नाही याबाबतच्या स्पष्ट सूचना विभागीय मंडळ स्तराबरुन माध्यमिक शाळांना देण्यात याव्यात.

१२. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये संबंधित प्रशिक्षण संस्थेव्दारे ऑनलाईन आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे.

१३. नियमीत शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाव्दारेच भरण्यात यावे.

१४. उपरोक्त नियमीत आवेदनपत्र भरण्याच्या मुदत वाढीनंतर पुन:श्च मुदतवाढ देण्यात येणार नाही याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व शाळा प्रमुखांना कळविण्यात यावे.

## ** वितरण केंद्र प्रमुखांना महत्वाची सूचना **

**वितरण केंद्र प्रतिनिधींनी त्यांच्याकडे माध्यमिक शाळांनी नियमित व विलंब शुल्कान्वये बँकेत शुल्क भरेलल्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-List मंगळवार <u>दिनांक २३/०२/२०२१</u> रोजी मंडळ कार्यालयाकडे जमा करावीत.**

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.